# आकाशवाणी पुणे
# प्रादेशिक वृत्तविभाग
# राष्ट्रीय बातमीपत्र
# सकाळी 08 वाजून 30 मिनिटं

**दिनांकः07.01.2026** **वारःबुधवार**

---

1. विशेष सखोल पुनरीक्षणानंतर उत्तर प्रदेशातील प्रारूप मतदार यादीतून सुमारे दोन कोटी एकोणनव्वद लाख मतदारांची गळती
2. विविध प्रकल्पांसाठी गुंतवणूकदार, विकासकांसाठी सार्वजनिक-खाजगी भागीदारी अर्थात प्रकल्पांची रूपरेषा
3. ONDC या सुविधा देणाऱ्या प्लॅटफॉर्मवर 170 हून अधिक स्मारकं आणि संग्रहालयांसाठी ऑनलाइन तिकीट विक्रीची सुविधा आणि
4. देशांतर्गत स्थानिक फुटबॉल स्पर्धांना चालना देण्यासाठी इंडियन सुपर लीग 14 फेब्रुवारीपासून

**<u>एसआयआर</u>**

विशेष सखोल पुनरीक्षण अर्थात एसआयआर अंतर्गत निवडणूक आयोगाने उत्तर प्रदेशसाठी प्रारूप मतदार यादी काल लखनौमध्ये प्रसिद्ध केली. या प्रारूप मतदार यादीमध्ये 12 कोटी 55 लाख 56 हजार पेक्षा अधिक मतदारांची नावे आहेत. विद्यमान मतदार यादीतील 81 टक्क्यांपेक्षा अधिक मतदारांनी आपले अर्ज भरून नवीन प्रारूप मतदार यादीसाठी नावं नोंदवली आहेत.उत्तर प्रदेशचे राज्य निवडणूक अधिकारी नवदीप रिनवा यांनी माध्यमांना ही माहिती दिली विद्यमान मतदार यादीमध्ये एकंदर 15 कोटी 44 लाख 30 हजार 92 मतदार होते. या
निवडणूक आयोगाने जारी केलेल्या नवीन प्रारूप मतदार यादीत एकूण 2 कोटी 89 लाख मतदारांची नावे न आढळल्यानं एकंदर 19 टक्के नागरिकांची नावे मतदार यादीतून वगळण्यात आली आहेत. विशेष पडताळणी मोहिमेदरम्यान 46 लाख 23 हजार मतदार, म्हणजेच विद्यमान मतदार यादीच्या

एकंदर 3 टक्के मतदार मृत आढळले. यासंदर्भातील दावे आणि आक्षेप स्वीकारण्याचा कालावधी 6 जानेवारी ते 6 फेब्रुवारी पर्यंत निश्चित करण्यात आला असून 6 जानेवारी ते 27 फेब्रुवारी या कालावधीत, दावे आणि आक्षेपांवर निर्णय घेतला जाईल. अशी माहितीही रिनवा यांनी दिली. उत्तर प्रदेशच्या मतदार यादीचे अंतिम प्रकाशन 6 मार्च रोजी केले जाईल. त्यानंतर, नागरिकांना दावे आणि आक्षेप सादर करण्यासाठी एक महिन्याचा कालावधी मिळेल.

**<u>पीपीपी</u>**

विविध प्रकल्पांसाठी गुंतवणूकदार, विकासक आणि इतर भागधारकांना अधिक माहितीपूर्ण नियोजन आणि गुंतवणुकीचे निर्णय घेणे शक्य व्हावे यासाठी केंद्रीय अर्थसंकल्प 2025-26 मध्ये केलेल्या घोषणेच्या अंमलबजावणीच्या दृष्टीने, आर्थिक व्यवहार विभागाने तीन वर्षांची सार्वजनिक-खाजगी भागीदारी अर्थात PPP प्रकल्पांची रूपरेषा तयार केली आहे. अशी माहिती अर्थ मंत्रालयाने काल दिली. या प्रकल्प रूपरेषेत केंद्रीय पायाभूत सुविधा मंत्रालयं, विविध राज्यं आणि केंद्रशासित प्रदेशांमधील 852 प्रकल्पांचा समावेश आहे, या प्रकल्पाची एकंदर किंमत 17 लाख कोटी रुपयांपेक्षा जास्त आहे. असंही मंत्रालयानं सांगितलं आहे.

**<u>पुरातत्व विभाग</u>**

भारतीय पुरातत्व सर्वेक्षण (एएसआय) ने ओपन नेटवर्क फॉर डिजिटल कॉमर्स अर्थात ONDC या सुविधा देणाऱ्या प्लॅटफॉर्मवर 170 हून अधिक केंद्र सरकारनं संरक्षित केलेल्या स्मारकं आणि संग्रहालयांसाठी ऑनलाइन तिकीट विक्रीची सुविधा सुरू केली आहे. अशी माहिती संस्कृतिक मंत्रालयानं दिली. एएसआयची तिकीट प्रणाली एका खुल्या डिजिटल नेटवर्कवर आणल्यामुळे, नागरिक आणि पर्यटक विविध ॲप्लिकेशन्सद्वारे तिकिटे बुक करू शकतील. यामुळे पर्यटकांना सुलभता मिळेल तसंच विविध विभाग क्षम डिजिटल प्रणालींद्वारे सार्वजनिक सेवांचा पारदर्शक आणि कार्यक्षम पुरवठा करू शकतील.

**<u>धर्मेंद्र प्रधान</u>**

भारताच्या विविध प्रादेशिक भाषा समाजाला एकत्र जोडतात आणि पंतप्रधान नरेंद्र मोदी नेहमीच सर्व भारतीय भाषा या राष्ट्रीय भाषा आहेत यावर भर देतात असं प्रतिपादन केंद्रिय शिक्षण मंत्री धर्मेंद्र प्रधान यांनी काल केलं
देशाच्या पाच अभिजात भाषांचे प्रतिनिधित्व करणाऱ्या 55 दुर्मिळ आणि मौल्यवान साहित्यकृतींचे प्रकाशन प्रधान यांच्या हस्ते काल झालं. त्यावेळी ते बोलत होते. हा साहित्यातिक ठेवा तमिळ, तेलगू, मल्याळम, कन्नड आणि ओडिया भाषांमध्ये आहे. ही पुस्तके केंद्रीय भारतीय भाषा संस्थेने प्रकाशित केली आहेत. केंद्रीय अभिजात तमिळ संस्थेद्वारे प्रकाशित केलेली 13 पुस्तके आणि तिरुक्कुरल सांकेतिक भाषा मालिकेचेही प्रकाशन

केले. गेल्या वर्षी सरकारने आणखी पाच भारतीय भाषांना अभिजात भाषा म्हणून मान्यता दिली आहे. या भाषांमध्ये मराठी, तेलगू, बंगाली, आसामी, पाली आणि प्राकृत यांचा समावेश आहे. असंही ते म्हणाले.

**<u>जयशंकर</u>**

लक्झेंबर्ग आणि भारतादरम्यान फिनटेक, अवकाश आणि कृत्रिम बुद्धिमत्ता यासारख्या क्षेत्रात सहकार्य वाढवण्याची मोठी क्षमता आहे, असं परराष्ट्र व्यवहारमंत्री डॉक्टर एस. जयशंकर यांनी म्हटलं आहे. जयशंकर फ्रान्स आणि लक्झेंबर्गच्या सहा दिवसांच्या दौऱ्यावर आहेत. लक्झेंबर्गचे पंतप्रधान लुक फ्रीडेन आणि उपपंतप्रधान आणि परराष्ट्र व्यवहारमंत्री झेवियर बेटेल यांच्याशी त्यांनी चर्चा केली. लक्झेंबर्ग केवळ द्विपक्षीय भागीदार म्हणूनच नव्हे, तर युरोपीय महासंघांमध्ये देखील, उभयपक्षी संबंध मजबूत करण्यासाठी महत्त्वाची भूमिका बजावतो. यावेळी दोन्ही देशांमध्ये वित्त, गुंतवणूक, तंत्रज्ञान, नवोन्मेष, डिजिटल सेवा इत्यादी क्षेत्रांमध्ये सहकार्य वाढविण्यावर चर्चा झाली. तसंच जयशंकर यांनी लक्झेंबर्गमधील भारतीय समुदायाच्या नागरिकांशी संवाद साधला

**<u>व्हेनेझुएला</u>**

गेल्या शनिवारी व्हेनेझुएलावर अमेरिकेने केलेल्या हल्ल्यादरम्यान एकंदर 24 सुरक्षा अधिकाऱ्यांचा मृत्यू झाला असून या कारवाईत आतापर्यंत 56 अधिकाऱ्यांनी आपले प्राण गमावले आहेत असं व्हेनेझुएलाच्या सैन्य दलाकडून काल सांगण्यात आलं. या घटनेला युध्द असे संबोधून हा गुन्हा असून प्रोसेक्युटर या घटनेची चौकशी करतील. असं व्हेनेझुएलाचे ॲटर्नी जनरल तारेक विल्यम साब यांनी म्हटलं आहे. व्हेनेझुएलामध्ये कार्यरत असलेले 32 क्युबन लष्करी आणि पोलीस अधिकारी या कारवाईत मरण पावले आहे, ज्यामुळे कॅरिबियन बेटावर दोन दिवसांचा राष्ट्रीय दुखवटा पाळण्यात आला.

**<u>पंजाब-अमली पदार्थ</u>**

पंजाब पोलिसांच्या अंमली पदार्थ विरोधी कार्यदलानं काल सीमा सुरक्षा दलासोबत (बीएसएफ) केलेल्या दोन वेगवेगळ्या संयुक्त कारवाईत शस्त्रे, दारूगोळा आणि अंमली पदार्थांसह 7 जणांना अटक केली आहे. अमृतसरमधील एका सीमावर्ती गावातून त्यांनी सुमारे 20 किलो हेरॉईन या अमली पदार्थासह चार जणांना ताब्यात घेतलं.

**<u>क्रिडा</u>**

देशांतर्गत स्थानिक फुटबॉल स्पर्धांना चालना देण्यासाठी इंडियन सुपर लीग १४ फेब्रुवारीपासून सुरू होईल. अशी घोषणा केंद्रीय क्रीडा मंत्री मनसुख मांडविया यांनी काल केली. सप्टेंबरमध्ये सुरू होणारी आयएसएल, मोहन बागान आणि ईस्ट बंगालसह सर्व १४ क्लब्सच्या सहभागाने खेळली जाईल. हे दोन्ही क्लब अखिल भारतीय फुटबॉल महासंघाने अर्थात एआयएफएफने सुचवलेल्या आर्थिक प्रणालीला विरोध करत होते. मांडविया यांनी केंद्र सरकार, अखिल भारतीय फुटबॉल महासंघ आणि क्लबचे प्रतिनिधी यांच्या संयुक्त बैठकीनंतर ही घोषणा केली.
गेल्या वर्षी डिसेंबरमध्ये मुदत संपलेल्या मास्टर राइट्स करारावरील अनिश्चिततेमुळे एआयएफएफचा व्यावसायिक भागीदार, फुटबॉल स्पोर्ट्स डेव्हलपमेंट लिमिटेडने जुलैमध्ये कामकाज थांबवल्यानंतर स्थानिक फुटबॉल स्पर्धा थांबवण्यात आल्या होता. नवीन भागीदारासाठी काढलेल्या निविदेला कोणताही प्रतिसाद मिळाला नव्हता.

## याबरोबरच हे राष्ट्रीय बातमीपत्र संपलं नमस्कार